# रस्त्याच्या निकृष्ट कामाच्या विरोधात रस्ता रोको आंदोलन

**वेळूजें ।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील नियमित चर्चेचा विषय ठरलेला वेळूजें ते नांदगाव, वरसविहिर, खरवळ हा सतरा की.मी. अंतराच्या रस्त्यावर या वर्षी कोठ्यावधी रुपये खर्च झाला; परंतु लोकप्रतिनिधी, अधिकारी, आणि मक्ततेदार यांच्या दुर्लक्षामुळे या परिसरातील रस्त्यांची अतिशय दुरवस्था झाली आहे. याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी थेट रस्त्यावर उतरत आंदोलन केले.

हे रस्ते जणू नेहमी मृत्यूचे खड्डे बनले आहेत. शालेय विध्यार्थी आणि येथील चाकरमानी व रहिवाशी यांना त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी मंगळवारी (दि.१जुलै) परिसरातील ग्रामस्थ यांनी आंबोली, जवळील, जव्हार, त्रम्बक, अंबोली, हरसूल जाणाऱ्या रस्त्यावर आंदोलन केले. या वेळी काही काळ वाहतूक ठप्प झाली असल्याने प्रवाशी व शालेय विध्यार्थी यांची कोंडी झाली. या वेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मात्र नंतर तहसीलदार व उपअभियंता आल्याने व त्याच्याशी चर्चा केल्याने वाहतूक मोकळी करण्यात आली.





### लेखी आश्वासनाची मागणी

यावेळी बांधकाम उपअभियंता, यांनी जमलेल्या जनसमुदाय यांना लेखी आश्वासन दिले व पंधरा दिवसात पूर्वपार रस्ता दिरुस्त करण्यात येईल, असे सांगितले. तर ग्रामस्थांकडून जो मक्ततेदार यांनी या रस्त्याचे काम केले आहे त्यावर बांधकाम विभागाने गुन्हा नोंदवावा, असे सांगण्यात आले.

### बससेवा सुरळीत होण्यासाठी पर्यायी मार्गाची मागणी

प्रत्येक वर्षी या परिसरात भरपूर पाऊस पडतो.याची पूर्व कल्पना ही मक्तेदार यांना माहीत असूनही हेतुपूर्वक या परिसरातील काम ही निकृष्ट केली जातात, मुळातच या परिसरातील रस्ते हे पहिल्या पाऊस यातच निखळले असून, त्यावर भरपूर खड्डे पडल्याने ते त्वरित भरून विध्यार्थी याची बस सेवा सुरळित करावी अन्यथा पुन्हा आंदोलन केले जाईल, असा इशाराही या परिसरातील ग्रामस्थ यांच्याकडून देण्यात आला.

# नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात नेचर क्लबची बस सफारी

## पक्षी निरीक्षण अभ्यास सहल उत्साहात संपन्न



**नाशिक ।** महाराष्ट्रातील पहिले रामसर दर्जा मिळालेल्या नांदूर मध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात पक्षीमित्रांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून, वन विभागातर्फे रोज सकाळी सात वाजता गडकरी चौकाजवळील वन विभागाच्या कार्यालयाजवळून नांदूरमध्यमेश्वर बस सफारी सुरु झाली आहे.

या बस सफारीला नाशिकारांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, नुकतीच नाशिक येथील नेचर क्लब ऑफ नाशिक या संस्थेने पक्षी अभयारण्यात बस सफारीद्वारे अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी सहायक वनसंरक्षक हेमंत उबाळे यांचे मोठे सहकार्य मिळाले. पावसाळ्यात अनेक पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो.अनेक वनफुले, फुलपाखरे, कीटक, जलचर प्राणी देखील पावसाळ्यात अभयारण्यात बघावयास मिळतात. लेपर्ड मन तथा सहायक वन संरक्षक सुनील वाडेकर यांच्या सोबत वीस पक्षीमित्रांनी या अभ्यास सहलीमध्ये सहभाग घेतला. यावेळी वन विभागाने सुरु केलेल्या बस सफारीमध्ये प्रवास करताना नेचर क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष प्रा.आनंद बोरा यांनी पक्षी अभयारण्याची माहिती दिली.

चापडगाव येथील पक्षी निरीक्षण टॉवर वरून पक्षी निरीक्षण करण्यात आले. यावेळी स्थानिक रहिवासी विद्यार्थिनी अमृता आघाव हिने बस मधील पक्षी मित्रांना ओवाळून स्वागत केले. येथील स्थानिक गाईड पंकज चव्हाण, रोषण पोटे, विकास गारे आदींनी पक्षी अभयारण्याची माहिती दिली. त्या नंतर नांदूरमध्यमेश्वर धरणा जवळील निसर्ग परिचय केंद्राला भेट देवून तेथे पक्ष्यांची माहिति चित्रफिती द्वारे देण्यात आली. धरण परिसरातील मंदिरे देखील या निमित्ताने पक्षीमित्रांनी बघितली. या बस मुळे पक्षी अभयारण्यातील पक्षी, प्राचीन मंदिरे आणि निसर्ग परिचय केंद्र बघण्याची संधी पक्षीप्रेमींना मिळणार आहे. या अभ्यास सहलीमध्ये वनरक्षक कैलास सदगीर, संस्थेचे अध्यक्ष प्रा.आनंद बोरा, जेष्ठ नाट्य लेखक दत्ता पाटील, प्रमोद फाल्गुने, विठ्ठल नंदन, रवींद्र वामनाचार्य, उमेशकुमार नागरे, कीर्ती मारू, सनी सोसे, भीमराव राजोळे, योगेश रोकडे, प्रतिभा पाटील, डॉ. ऋषिकेश शेवाळे, आदित्य आघाव, रोहित मोगल, प्रमोद मोगल आदींसह स्थानिक विद्यार्थी देखील सहभागी झाले होते.

# सुनील गीत यांचा राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मान



**इंदिरानगर ।** पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुनील बलराम गीत यांना राष्ट्रपती भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पोलीस सेवेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर करण्यात आले होते. दि. २६ जून रोजी राजभवन, मुंबई येथे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन याचे हस्ते अलंकरण सोहळ्यात राष्ट्रपतींचे पोलीस पदक प्रदान करून गीत यांना सन्मानित करण्यात आले आहे. या अलंकार सोहळ्यास पोलीस महा संचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई येथील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सुनील गीत यांना राष्ट्रपतींचे पदक मिळण्यामागे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक याचे सह पोलीस अधिकारी, सहकारी कुटुंबीयांचा मोलाचा वाटा आहे. पदक मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. ते इंदिरानगर गंधर्व नगरीतील रहिवासी आहे.

# जात पडताळणीची ४ जुलैपर्यंत विशेष मोहीम

**नाशिक ।** राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक कार्यालयामार्फत ४ जुलै २०२५ पर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत असून याअंतर्गत इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित मागसवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत, अशी माहिती जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी तथ सदस्य सचिव योगेश पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

सीईटी परीक्षा देणारे व उत्तीर्ण झालेले आणि पदविकेच्या तृतीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज देखील या मोहिमेत समितीद्वारे स्वीकारले जाणार आहेत.

## ➤ महत्त्वाचे

### शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर, धरती आबा जनभागीदारी अभियान

**पेठ ।** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी नाशिक प्रकल्पांतर्गत पेठ तालुक्यात काल (दि.३०) जुन रोजी नगरपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर व धरती आबा जनभागीदारी अभियान



आयोजित करण्यात आले होते. या अभियनांतर्गत प्रधान मंत्री धरती आबा जन भागीदारी अभियाना अंतर्गत अनुसुचित जमातीच्या पात्र लाभार्थीना वैयक्तिक व सामुहिक योजनांचा लाभ देण्यात आला. या अभियनांतर्गत महसूल विभागांतर्गत विविध योजनांच्या १८५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला तर आरोग्य विभाग २३९, पंचायत समिती ४९, कृषी विभाग ५०, एकात्मिक बालविकास प्रकल्प २६ अशा एकुण ५४९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले. सदरील शिबीर तहसीलदार आशा गांगुर्डे (संघवी) यांच्या मार्गदर्शना खाली घेण्यात आले.यावेळी विविध शासकीय विभागाचे अधिकारी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी नागरिक,महिला शालेय विद्यार्थी कर्मचारी व महा ई-सेवा चालक उपस्थित होते.

### सिरसाटवाडी येथे बिबट्याने घातला धुमाकूळ

**कावनाई ।** येथील सिरसाटवाडीत सोमवारी रात्रीच्या सुमारास बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शेळी ठार झाली. तर २५ गावठी कोंबड्या ठार केल्या. यामध्ये शेतकरी शिवाजी मलू सिरसाट यांचे सुमारे १५ हजार रुपयांचे नुकसान झाले, तर बाळासाहेब मते यांचे दहा हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सिरसाट यांनी जनावरांसाठी आपल्या घरा समोरील गोठ्यात काही गुरे व शेळी बांधलेली होती. मात्र, बिबट्याने या गोठ्यात आत प्रवेश केला व तीन वर्षांची गाभण शेळी ठार केली. तसेच मते यांच्या पोल्ट्री फॉर्म मध्ये प्रवेश करून कोंबड्या फस्त केल्या. या घटनेची माहिती मिळताच वनरक्षक प्रियंका पाटील व वनमजूर प्रसाद पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मागील काही दिवसांपासून या परिसरात बिबट्याचे सतत दर्शन होत असल्यामुळे जनावरांवरील हल्ल्यांची मालिका सुरूच आहे. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वन विभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### पावसामुळे रस्त्यांची झाली चाळणी

**नाशिक ।** गेल्या महिना-पंधरा दिवसांपासून शहर परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे शहरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर खड्डे पडत असून, खडी रस्त्यावर पसरत आहे. महापालिकेच्या बांधकाम विभागाने केलेली कामे सुमार दर्जाची असल्याने जोरदार पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडत असून, सुमार कामाचे पितळ उघडे पडत आहे. गेल्या पंधरवड्यात महापालिका आयुक्त यांनी खड्डे बुजवण्याचे आदेश दिले होते जोरदार पावसाला सुरुवात होण्यापूर्वीच खड्डे बुजवण्याचे आदेश दिलेले असतानाही अति संत गतीने खड्डे बुजवण्याचे काम काडीने मलम लावल्यासारखे करण्यात आल्याने अवघ्या रस्त्यांची चाळण झाल्याची स्थिती आहे.

# नाशिक, जळगांव, नागपूर, वर्धा, नांदेड यांची विजयी सलामी

**३५ वी महाराष्ट्र राज्य सेपक टकरा स्पर्धा**





**नाशिक ।** नाशिक जिल्हा सेपक टकरा असोसिएशनच्या वतीने आणि महाराष्ट्र सेपक टकरा असोसिएशनच्या मान्यतेने आणि त्यांच्या आधीपथ्याखाली नाशिकच्या पंचवटी येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या हॉलमध्ये वरिष्ठ गटाच्या ३५ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी गटवार साखळी सामने खेळविले गेले. पुरुषांच्या गटामध्ये यजमान नाशिक, नागपूर, वर्धा जळगांव या संघांनी आपले साखळी सामने जिंकून विजयी सलामी दिली तर महिलांच्या गटात यजमान नाशिकसह, सोलापूर, वर्धा आणि नांदेड या संघांनी आपले साखळी सामने जिंकून आपल्या गटामध्ये आघाडी मिळविली आहे.

पुरुषांच्या गटात यजमान नाशिकच्या संघाने अकोला संघावर २-० अशी मात केली. वर्धा संघाने सोलापूर संघाचा २-० असा पराभव करून विजय प्राप्त केला. जळगांव संघाने पुणे संघावर २-० असा विजय मिळविला. नाशिक संघाने आपल्या दुसऱ्या सामन्यातही सुंदर खेळाचे प्रदर्शन करून जालना संघाला २-० असे पराभूत करून आपल्या गटामध्ये आघाडी घेतली आहे. या स्पर्धेत बलाढ्य समजल्या जाणाऱ्या नागपूरच्या संघाने अमरावती संघावर २-० असा विजय मिळवत आपले विजयी अभियान सुरु केले. महिलांच्या गटामध्ये यजमान नाशिकने सहज सुंदर खेळ करत बलाढ्य नागपुर संघावर २-१ असा विजय मिळवून सर्वांना चकित केले.

यानंतरच्या सामन्यातही नाशिकच्या महिलांनी सुंदर खेळ करून छत्रपती संभाजीनगर संघावर २-० असा सहज विजय मिळवत बाद फेरीसाठी आपला मार्ग मोकळा केला. महिलांच्या इतर सामन्यात सोलापूरच्या पुणे संघाचा २-०, वर्धा संघाने अकोला संघावर २-० तर नंदेश संघाने मुंबई संघावर २-० असा विजय मिळवत बाद फेरीकडे आपली वाटचालसुरु ठेवली आहे.

# दिंडोरी विधानसभा मतदारसंघ पक्ष निरीक्षकपदी जगदीश पवार

**देवळा ।** दिंडोरी विधानसभा मतदारसंघाच्या पक्ष निरीक्षक म्हणून देवळा तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष जगदीश पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या (अजित पवार) आढावा बैठकीत जिल्हाध्यक्ष अड. रवींद्र पगार यांच्या हस्ते जगदीश पवार यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी नवनियुक्त पक्ष निरीक्षक पवार यांचा ना. नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी गणपतराव पाटील, तालुकाध्यक्ष राजेंद्र उफाडे, विश्वासराव देशमुख, जि.प.चेमाजी उपाध्यक्ष प्रकाश वडजे, डॉ गोसावी, माजी जि.प. सदस्य विलास कड, सरपंच गोकुळ



झिरवाळ आदी उपस्थित होते. पवार यांच्या निवडीचे देवळा बाजार समितीचे सभापती योगेश आहेर, माजी जिप सदस्य यशवंत शिरसाठ, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास देवरे, युवकचे अध्यक्ष तेजस अहिरे, नगरसेवक संतोष शिंदे, अतुल आहेर, बाळासाहेब मगर, भाऊसाहेब आहेर, सतिष सूर्यवंशी आदींनी अभिनंदन केले आहे.

> आगामी होऊ घातलेल्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष निरिक्षक म्हणून पक्षाने माझ्यावर दिंडोरी सारख्या मोठ्या तालुक्याची जबाबदारी सोपवली असून, पक्षाच्या ध्येय धोरणानुसार सर्वांना सोबत घेऊन न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात येऊन यात पारदर्शक पद्धतीने कामकाज करण्यात येईल.
>
> **– जगदीश पवार, नवनियुक्त पक्ष निरीक्षक, दिंडोरी विधानसभा**

# राजस्व अभियानातून शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न : डॉ. आप्पासाहेब शिंदे

**दिंडोरी ।** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत आयोजित समाधान शिबिरामध्ये शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना देण्यात आला. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी दिंडोरी पेठचे उपविभागीय अधिकारी डॉ. आप्पासाहेब शिंदे होते.

अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. शिंदे म्हणाले, "राजस्व अभियानाचा उद्देश म्हणजे शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत थेट पोहोचवणे. या उपक्रमातून नागरीकांचे व विद्यार्थ्यांचे प्रश्न एकाच ठिकाणी सोडवले जात असून, त्यांना वेळेत आणि प्रभावी सेवा मिळत आहे." कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून वाव दीपप्रज्वलन करून करण्यात आली.



तहसीलदार मुकेश कांबळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. त्यांनी सांगितले, "या अभियानामुळे विविध खात्यांच्या समन्वयातून नागरिकांना त्वरित सेवा मिळते आहे. महसूल विभागाच्या वतीने नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात शेतकरी सहकारी संघाचे चेअरमन बाळासाहेब जाधव,नगराध्यक्ष सुनीता लहांगे, उपनगराध्यक्ष माधुरी साळुंखे, नगरसेवक, कृषी अधिकारी नाना भोये आदींसह मान्यवर उपस्थित होते,

महसूल विभाग -संजय गांधी निराधार योजना 11, रेशन कार्ड 39, उत्पन्न दाखले 645, जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत वारस नोंदीचे सातबारा 57, आरोग्य विभाग -आयुष्मान भारत गोल्ड कार्ड 15 शिक्षण विभाग शालेय पुस्तके व गणवेश 62, कृषी विभाग बियाणे वाटप 26, नगरपंचायत विभाग पीएम स्व निधी योजना 18, पंतप्रधान महाआवास अभियान 2 इत्यादी लाभार्थीना दाखले वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार वसंत धूमसे यांनी केले. प्रास्तविकातून शिबिराची माहिती दिली. या शिबिरात महसूल, सामाजिक न्याय, आरोग्य, कृषी, महिला व बालकल्याण, शिक्षण व नगरपंचायत इत्यादी विभागांच्या योजनांची माहिती आणि सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली. शिबिरास लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबीर यशस्वीतेसाठी चैताली दराडे, सुरेश बकरे,अजय मोतीराय, अक्षय लोहारकर सर्कल अधिकारी भारती रकीबे व तलाठी तसेच विविध विभागतील अधिकारी कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचा पर्यावरणपूरक कुंभमेळ्यासाठी स्तुत्य उपक्रम

**• ३० लाख स्टीलची ताटे, ग्लास व कापडी पिशव्यांचे करणार वाटप**
**• प्लॅस्टिकचा वापर टाळण्याबरोबरच प्रदूषणमुक्तीसाठी प्रयत्न**

**नाशिक ।** आगामी काळात नाशिकध्ये पार पडणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात होणारे प्रदूषण लक्षात घेता अमृतस्नानासाठी नाशिकमध्ये येणाऱ्या सर्वच आखाडे, खालसे यांना महाप्रसादासाठी प्रत्येकी ३० लाख ताटे आणि पाणी पिण्यासाठी ग्लास आणि कापडी पिशव्यांचे वाटप केले जाणार आहेत. हा उपक्रम रामतीर्थ गोदावरी सेवा समितीमार्फत राबविला जाणार असल्याची माहिती रामतीर्थ गोदावरी समितीचे अध्यक्ष जयंत गायधनी यांनी दिली.

मदन मोहन इस्कॉन मंदिर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. व्यासपीठावर उपाध्यक्ष नृसिंह कृपादास, उद्योजक धनंजय बेळे, वेदमूर्ती शांताराम भानोसे, आर्किटेक्ट शैलेश देवी, विनायक काळे, रनजितसिंह आनंद, वैभव क्षेमकल्याणी, राजेंद्र फड, कल्पेश लोया, रामेश्वर मालाणी, शिवाजी बोंदार्डे आदी उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळ्यात होणारी अमृत स्नान पर्वणी ऐन पावसाळ्यातच येणार असल्याने निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी समितीने पर्यावरणपूरक, प्रदूषणमुक्त हरित कुंभ होण्याच्या दृष्टिकोनातून विविध उपक्रम हाती घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून पर्यावरणपूरक साहित्याचा वापर आणि येणाऱ्या लाखो साधू महंत आणि आख्याडयांना सुटसुटीत योजना व पर्यावरण रक्षण यावर लक्ष केंद्रित केले आहे. या उपक्रमासाठी राज्य शासनाच्या प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे तांत्रिक सल्ले व सहकार्य घेतले जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर समितीतर्फे संदर्भ ग्रंथ स्मरणिका तयार करण्यात येणार असून ती देश विदेशातील भाविकांसाठी उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास सदस्यांनी व्यक्त केला.



### सर्व संघटनांना सहभागी करणार...

आगामी सिंहस्थ कुंभमेळा प्रदूषणमूक्त करण्यासाठी समाजातील सर्व घटकांबरोबरच युवक, युवती, स्वयंसेवक, सांस्कृतिक दूत, डिजिटल प्रचारक, स्वयंसहाय्यता गटांचा हातभार, निवृत्त अधिकाऱ्यांचे संयोजन, मार्गदर्शन घेण्याबरोबर बचतगट, औद्योगिक आस्थापना, विविध मित्र मंडळे यांना देखील सामावून घेणार आहेत. तसेच ताटे, ग्लास आणि कापडी पिशव्यासाठी राष्ट्रीय व जागतिक कीर्तीच्या संस्था, महत्वाचे सर्व आखाडे, साधू, संत-महंत यांचे पाठबळ मिळवण्याचा देखील प्रयत्न समितीमार्फत करण्यात येत आहे.

### प्रयागराज कुंभचा घेतला धडा

नुकताच प्रयागराज येथे पार पडलेल्या सिंहस्थात ३० हजार टन कचरा निर्माण झाला. नाशिकमध्ये २०२७ साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी १ हजार २५० आखाडे येण्याची शक्यता आहे. या आखाड्यांकडून मोठ्या प्रमाणावर महा प्रसादाचे आयोजन केले जाते. त्यामुळे पत्रावळींची विल्हेवाट लावताना प्रशासनावर मोठा ताण येईल. हा कचरा निर्माण होवून रागराई पसरू नये म्हणून स्टीलची ताटे आणि ग्लास देण्यात येणार आहे. हे भांडी कायमस्वरूपी दिली जाणार आहे. **– धनंजय बेळे, उद्योजक**

# गुन्हा नोंद होण्यासाठी प्रेतालाही करावी लागली तीन दिवस प्रतिक्षा

## सातपूरला विवाहितेची आत्महत्या, तीन दिवसांनी गुन्हा दाखल



**नाशिक ।** माहेरहून पैसे आणण्यासाठी तगादा लावूनही माहेरून पैसे आणत नसल्याने एका विवाहितेला मारहाण व शारीरिक छळ होत असल्याने कंटाळून विवाहितेने आत्महत्या केली. असे असून देखील पोलीस यंत्रणा राजकीय दबावापोटी गुन्हा देखील दाखल करत नव्हती. गुन्हा दाखल करण्यासाठी माहेरच्या मंडळींना अखेर पोलीस आयुक्तालय गाठावे लागले. अखेर तीन दिवसांनी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला. एका विवाहितेला मरणानंतर देखील न्यायासाठी यातना भोगाव्या लागल्या हे दुर्दैव. या घटनेची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई व्हावी अशी मागणी नातेवाईकांकडून होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, शनिवार दि.२८ जुन रोजी सातपूर येथील रहिवासी असलेल्या भाग्यश्री उर्फ पुजा महेश गुंजाळ (२२) या विवाहितेला माहेरहुन ५० हजार रूपये आणण्यासाठी दबाव टाकुन पैसे न आणल्याने मयत यांना लाथाबुक्यांनी मारहाण



करून, शिवीगाळ करून त्यांचा आतोनात शारीरीक व मानसिक छळ केला जात होता. सासरच्या या शारीरिक व मानसिक स्थळाला कंटाळून विवाहिता भाग्यश्री उर्फ पूजा गुंजाळ हिने आत्महत्या केली. पूजाचे शव जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणले गेले. माहेरच्यांनी आमच्या मुलीला न्याय द्या असा आक्रोश करत सातपूर पोलीस स्टेशन गाठले. परंतु राजकीय वरदहस्त असलेल्या सासरच्या मंडळीं विरोधात सातपूर पोलीस अधिकारी मात्र गुन्हा दाखल करण्यासाठी पाऊल उचलत नव्हते. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार न करण्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेतला. दोन दिवस सातपूर पोलीस स्टेशनच्या बाहेर ठिय्या मांडून देखील गुन्हा दाखल झाला नाही. शेवटी संबंधितांवर गुन्हा दाखल होण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्याकडे जावून न्याय मागितला. शेवटी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये सातपुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती महेश वसंत गुंजाळ वय ३१ वर्षे, सासु सुरेखा वसंत गुंजाळ वय ५२ वर्षे, मावस सासरे वसंत गोविंद गुंजाळ वय ५५ वर्षे राह. प्लॉट नं.२४, सिध्द हनुमान मंदीराजवळ, हिरे गार्डन, अशोकनगर, सातपुर, नाशिक, नणंद गौरी रोकडे वय ३२ वर्षे रा. पाथर्डी फाटा, नाशिक, मावस सासरे प्रमोद कु-हाडे रा. मारवाही ता. निफाड जि.नाशिक, मावस सासु जया प्रमोद कु-हाडे रा.मारवाही ता.निफाड जि. नाशिक. यांच्याविरोधात फिर्याद दाखल करण्यात आले.

### यापुढेही आम्हाला न्याय मिळेल का?

मागील काही महिन्यांपूर्वी पुणे येथील हगवणे परिवारातील वैष्णवी हगवणे हिच्या मृत्यूनंतर अख्या महाराष्ट्राने निषेध नोंदवला. तोच प्रकार माझ्या बहिणी सोबत झाला. परंतु गुन्हा नोंद करण्यासाठी आम्हास तीन दिवस मृतदेहावर अंत्यसंस्कार करता आले नाही. पोलिसांवर राजकीय लोकांनी टाकलेल्या राबवामुळे आमची साधी दखल घेतली गेली नाही. शेवटी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आमची आर्त हाक ऐकली व गुन्हा नोंद करण्यासाठी आदेश दिले. परंतु, यापुढेही आम्हाला न्याय मिळेल का? अशी शंका उपस्थित केली जात असून गुन्हा नोंद करण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्यांवर कारवाई होणे अपेक्षित आहे. **– अमोल कापसे, मृत विवाहितेचा भाऊ**



# आ. सीमा हिरेंचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न

**सिडको ।** पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सीमा हिरेंचा वाढदिवस मोठ्या उत्साहात तसेच विविध लोकाभिमुख कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त भाजपाच्या पदाधिकाऱ्यांकडून सिडको परिसरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत सांयकाळी खुटवडनगर येथील सिध्दी बॅक्वेट हॉलमधील सोहळ्यात आ.हिरेंची वहीतूला करण्यात आली. दिवसभर विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे सरचिटणीस अॅड नितीन ठाकरे, माजी महापौर रंजना भानसी, माजी नगरसेवक उध्दव निमसे, दिनकर आढाव, शिवाजी गांगुर्डे, राजेद्र महाले, आश्विनी बोरस्ते, चंद्रकात थोरात, अरूण पवार, निमाचे अध्यक्ष अशिष नहार, प्रशांत जाधव, राष्ट्रवादीचे रविंद्र पगार, आनंद सोनवणे, प्रतिभा पवार, राकेश ढोमसे, राकेश दोंदे, मुकेश शहाणे, भगवान दोंदे, गोविंद घुगे, पुष्पा आव्हाड, सतिश सोनवणे, अॅड. शाम बडोदे, भूषण राणे, छाया देवांग, अलका आहिरे, हर्षदा गायकर, मधुकर जाधव, सचिन कुलकर्णी, मंडल अध्यक्ष डॉ. वैभव महाले, नारायण जाधव, अजिक्य गिते, राहूल गणोरे, जितेंद्र चोरडिया, प्रविण पाटील, सागर शेलार आदी मान्यवरांसह सिडको आणि सातपूर परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंकुश वराडे, भाग्यश्री ढोमसे, गणेश अरिंगळे, सुबोध नागपुरे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

जनता युवा मोर्चाचे नवीन नाशिक अध्यक्ष अरूण दातीर, दिपक खवणे यांच्यावतीने सकाळी माऊली लॉन्स जवळील साई हॉलमध्ये परिसरातील सुमारे दोनशे नागरिकांना इ श्रम कार्डचे वाटप करण्यात आले. उपस्थित महिलांकडून आ.हिरेचे औक्षण करण्यात आले. यावेळी सौ. रश्मीताई हिरे,मंडल अध्यक्ष डॉ.वैभव महाले,माजी नगरसेविका भाग्यश्री डोमसे, प्रतिभा पवार, युवा मोर्चा अध्यक्ष सागर शेलार,शरद फडोळ,समाधान दातीर,विजय मोगल आदी मान्यवर उपस्थित होते.

छावा सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष शिवा तेलंग आणि पुजा तेलंग यांच्या पुढाकाराने एक वृक्ष -हजारो श्वास या संकल्पनेतून प्रभाग क्रंमाक एकतीस मधील पाथर्डीफाटा परिसरात विशेष वृक्षारोपन करण्यात आले.यानंतर केक कापून आ.हिरेंचा वाढदिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छावा सेनेचे संस्थापक करण गायकर, राजाभाऊ खरात,जपेश मोरे, किरण क्षिरसागर,अनिल कोठावदे, माधव मेधणे,राजेंद्र पाटील आदींसह नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# मविप्र फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी झळकले राष्ट्रीय स्तरावर

## नायपर जेईई परीक्षेत तेजश्री बच्छाव देशात ५० वी



**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नायपर जेईई या परीक्षेत शानदार कामगिरी करत संस्थेचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकावले आहे. तेजश्री गिरीश बच्छाव या विद्यार्थिनीने एम.टेक. इन मेडिकल डिव्हाइस (सेशन -२) मध्ये ऑल इंडिया रँक (एआयआर) ५० तर एम.एस./ एम.बी.ए./एम.फार्म. (सेशन-१) मध्ये ऑल इंडिया रँक १९३ मिळवित दुहेरी यश प्राप्त केले आहे.

शुभम संतोष गोरशेटे या विद्यार्थ्याने एम.टेक. इन मेडिकल डिव्हाइसमध्ये ७५ वा (एआयआर) आणि एम.एस./एम.बी.ए./ एम.फार्म.मध्ये ७८ वा (एआयआर) क्रमांक मिळविले. प्रणाली दत्तात्रय सानप हिने 'एमटेक'मध्ये ९१ वा (एआयआर) आणि एम.एस./एम.बी.ए./एम.फार्म.मध्ये १४५ वा (एआयआर) क्रमांक मिळविला. यश सुदाम साळुंके याने एमटेकमध्ये १४६ वा (एआयआर) क्रमांक, सानिका संजय माळोदे हिने 'एमटेक'मध्ये ४८३ वा (एआयआर) आणि एम.एस./ एम.बी.ए./ एम.फार्म.मध्ये २४२ वा (एआयआर) क्रमांक, जय पंढरीनाथ शिंदे याने 'एमटेक'मध्ये ३७५ वा (एआयआर) आणि एम.एस./ एम.बी.ए./ एम.फार्म.मध्ये ४०४ वा (एआयआर) क्रमांक मिळवून आपली छाप उमटवली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. व्ही. डेर्ले यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करताना सांगितले की, कठोर मेहनत आणि शिक्षकांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले आहे. मविप्रच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

नायपर-जेईई परीक्षेत यश मिळविणे, हे विद्यार्थ्यांसाठी फार्मसी क्षेत्रात करिअर घडविण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा मानले जाते. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाचे शिक्षण क्षेत्रातील योगदान अधिक ठळक झाले आहे. या विद्यार्थ्यांनी केवळ संस्थेचेच नव्हे, तर नाशिक शहराचेही नाव उंचावले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. यापुढेही त्यांनी यशाचा चढता आलेख असाच ठेवावा. **– अॅड. नितीन ठाकरे, सरचिटणीस, मविप्र समाज, नाशिक**

# 'वक्फ सुधार कायदा २०२५: फायदे आणि तोटे' पुस्तकाचे नाशिकमध्ये प्रकाशन

## तुमच्या हक्कांची जाणीव करून देणारे हे पुस्तक वाचा : मुफ्ती मंझूर ज़ियाई यांचे आवाहन




**नाशिक ।** देशभरातील वक्फ संपत्तीबाबत जागरूकता निर्माण करत "वक्फ सुधार कायदा २०२५: फायदे आणि तोटे" या विषयावर लिहिलेल्या महत्त्वपूर्ण पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच नाशिकमध्ये मोठ्या उत्साहात पार पडले. इल्म व हुनर फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे नेतृत्व प्रसिद्ध इस्लामी विद्वान मुफ्ती मंझूर ज़ियाई यांनी केले आहे.

या प्रकाशन सोहळ्याला शहर काझी मुफ्ती अलाउद्दीन रज़वी (ठाणे जिल्हा), मौलाना अखलाक निजामी (जनरल सेक्रेटरी, ऑल इंडिया उलेमा बोर्ड, मुंबई) यांच्यासह नाशिकमधील अनेक सामाजिक, धार्मिक आणि राजकीय मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. प्रकाशनानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना मुफ्ती ज़ियाई म्हणाले, "हे पुस्तक तुम्हाला तुमच्या हक्कांबाबत सजग करतं. देशभर वक्फ संपत्ती आहे, पण त्यावर इतरांचा ताबा आहे. समाजाची ही संपत्ती कोणाच्या ताब्यात आहे, हे जाणून घेणं गरजेचं आहे." मुफ्ती ज़ियाई यांनी स्पष्टपणे सांगितले की, "हा कायदा समाजासाठी किती फायदेशीर आहे आणि त्यात कोणते तोटे आहेत, हे समजून घेऊन योग्य निर्णय घ्या. लाभदायक मुद्दे स्वीकारा, आणि जे समाजविरोधी आहेत, त्याविरोधात कायदेशीर लढा द्या."ते पुढे म्हणाले, "पूर्वजांनी समाजाच्या हितासाठी वक्फ केलेली संपत्ती आज चुकीच्या हाती आहे. जर हे पुस्तक समाजाने वाचलं नाही तर भविष्यात शिक्षण, आरोग्यसुविधा, सामाजिक हक्कांपासूनही वंचित राहावं लागेल."या पुस्तकाच्या ३,००० प्रती वक्फ करून त्या मोफत वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे पुस्तक ऑनलाईनही उपलब्ध असून, शक्य तितक्या लोकांपर्यंत हे पोहोचवण्याचा प्रयत्न आहे, असे त्यांनी सांगितले.

मुंबईतील प्रकाशनानंतर नाशिकमधील हा कार्यक्रम संपन्न झाला असून, आता हे पथक पुढील टप्प्यात जळगाव आणि पुणे येथे जाऊन समाजप्रबोधन करणार आहे.वक्फ संपत्तीवरील जनजागृती आणि कायद्यातील सुधारणा समजावून सांगणारे हे पुस्तक एक सामाजिक दस्तऐवज ठरणार असून, समाजाला आपल्या हक्कांची जाणीव करून देणारा हा उपक्रम नक्कीच स्तुत्य असल्याचे ज़ियाई यांनी सांगितले.

# कातकरी बांधवांनी इगतपुरी तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढून मांडली व्यथा!



**कावनई ।** इगतपुरी तालुक्यातील आदिम कातकरी बांधवांनी आपल्या मूलभूत हक्कांसाठी अखेर आवाज उठवला. श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वाखाली शेकडो कातकरी बांधवांनी इगतपुरी तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढून आपली व्यथा मांडली.

स्वातंत्र्यानंतर ७८ वर्षे उलटून गेल्यानंतरही कातकरी समाजाला हक्काचे घर, रोजगार आणि मूलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. गायरान, वनविभाग तसेच काही खासगी जमिनींवरील वस्तीमध्ये अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत ते जीवन जगत आहेत. अर्ध्या पोटी राहणाऱ्या या समाजाचे अनेक प्रस्ताव लाल फितीत अडकले आहेत. जन्म दाखले, आधार कार्ड नाही. ग्रामपंचायतीकडे कुटुंबांची नोंदणी नाही, रोजगाराचे साधन नाहीत, घरकुलाचे हप्ते पडलेले नाही असे असतांना आदिवासी विकास विभाग व स्थानिक प्रशासन याकडे केवळ दुर्लक्ष केले जात आहे.

या वेदनादायी परिस्थितीवर भाष्य करताना श्रमजीवी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस संजय शिंदे म्हणाले, "आदिम कातकरी बांधवांना कायदा हातात घ्यायला भाग पाडू नका! अडाणीपणा व अज्ञानाच्या गर्तेत अडकून पडले आहेत. त्यांना बाहेर काढून पुढील पिढ्यांसाठी उज्वल भविष्य घडवणे ही आपली जबाबदारी आहे." बैठकीदरम्यान काही अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. कारण वस्तीवर वीज नाही, रस्ता नाही, पिण्याचे पाणी नाही, बालके शिक्षणापासून वंचित आहेत. घरात खायला नाही, मग कसा जगणार हा भूमीपुत्र? या मोर्चादरम्यान नायब तहसीलदार धनंजय लचके, विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर कराळे उपस्थित होते. यावेळी श्रमजीवी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस संजय शिंदे, तालुकाध्यक्ष गोकुळ हिलम, सचिव सुनील वाघ, सीताराम गावांडा यांच्यासह शेकडो बांधव उपस्थित होते. तहसीलदार अभिजित बारवकर यांना विविध समस्यांचे निवेदन देण्यात आले आणि मोर्चाची सांगता करण्यात आली. यावेळी इगतपुरी तालुका सेतू मार्फत २५० दाखले मोफत वाटप करण्यात आले. पंचायत समिती स्तरावर येत्या तीन तारखेला आदिम कातकरी बांधवांकारिता तातडीची बैठक घेण्यात येऊन समस्या सोडवल्या जातील असे आश्वासन तहसीलदार कार्यालय व पंचायत समितीकडून आश्वासित करण्यात आले.

# विश्व कल्याणासाठी सप्तश्रृंगी गडावर भागवत कथा, शिवशक्ती महायज्ञाचे आयोजन

**सप्तश्रृंग गड ।** श्रीक्षेत्र सप्तशृंगी गडावर येथे हर हर महादेवाच्या गजरात व आदिमायेच्या जयघोषात शिवशक्ती महायज्ञ व श्रीमद् भागवत सप्ताह कथामालेचा मंगलमय वातावरणात प्रारंभ झाला. ५ जुलै पर्यंत आयोजित महायज्ञ व सप्ताहा दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांबरोबच राष्ट्रीय संत संमेलन संपन्न होणार असल्याची माहिती दिगंबर आखाड्याचे महंत विष्णुदास महाराज यांनी दिली आहे.

श्री मार्कंडेय ऋषीच्या तपोभूमी व आद्य स्वंयभू शक्तिपीठ असलेल्या श्रीक्षेत्र सप्तशृंगी गडावर दिगंबर आखाड्याचे महंत विष्णुदास महाराज गेल्या ११ वर्षांपासून विश्व शांती व विश्व कल्याणासाठी गुप्त नवरात्रीचे औचित्य साधत शिवशक्ती महायज्ञ व शिव महापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करतात. या महायज्ञाला देशभरातून साधू महंतासह मोठ्या संख्येने भाविक हजेरी लावतात. गुरुवार, ता.२६ जुन पासून ४ जुलै पर्यंत गडावरील भक्तांगण हॉलमध्ये शिवमहापुराण कथा व शिवशक्ती महायज्ञ अर्थात (श्री महारूद्र एवम् सहस्त्र चण्डी यज्ञ) दरम्यान दररोज सकाळी ६ ते दुपारी १२ वाजे पर्यंत स्थापित देवतांचे पुजन रुद्राभिषेक (महारूद्र) व श्री दुर्गा सप्तशती पाठ (सहस्त्र चण्डी), दुपारी २.३० ते सांयकाळी ६ वाजे पर्यंत श्री रूद्र चण्डी यज्ञ व सायंकाळी ६.३० ते रात्री १० वाजे पर्यंत



शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. शिव महापूराण कथेचे निरुपम प महंत श्री अर्जुनदासजी महाराज, श्री कालिका मन्दिर, इन्दौर (मध्यप्रदेश) करीत आहे. शनिवार, ता. ५ जुलै रोजी सकाळी ९ वाजता कौमारिका पूजन, सकाळी १० वाजेपासून राष्ट्रीय संत सम्मेलन व दुपारी १ वाजता महाप्रसाद (भण्डारा) संपन्न होवून कार्यक्रमांची सांगता होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमात महंत श्री रामदासजी महाराज (ओंकारेश्वर), महंत श्री गोपालदासजी महाराज (होंशगाबाद), महंत श्री कृपासिंधु दासजी महाराज (सकेतपुरी), महंत श्री राघवेन्द्र दासजी महाराज (उज्जैन), स्वामी श्री ओंकार दासजी महाराज (राजस्थान) आदीसह ठिकठिकाणची साधु महंत सहभागी होणार असून भाविकांनी सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक व निमंत्रक महंत विष्णुदास महाराज यांनी केले आहे.

# महामार्गावरील रखडलेले काम थांबवा; अन्यथा तृप्ती देसाई यांचे नेतृत्वात तीव्र आंदोलन

**बेलगाव कुर्हे ।** मुंबई-नाशिक महामार्गावरील वाडीवर्‍हे ते पाडळी फाटादरम्यान सुरू असलेल्या रुंदीकरणाच्या रखडलेल्या कामामुळे वाहनधारकांचे हाल सुरूच असून, यामुळे अपघातांची मालिका सुरू झाली आहे. या कामाच्या धीम्या गतीमुळे त्रस्त नागरिकांच्या वतीने भूमाता ब्रिगेडचे



तालुकाध्यक्ष किरण मुसळे यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला आहे की, काम तातडीने पूर्ण न झाल्यास संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई स्वतः येऊन आंदोलन करतील. गेल्या दोन महिन्यांत म्हणजे मे व जूनमध्ये एकूण ७२ अपघात झाले असून, त्यात ८ ते ९ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. रखडलेल्या कामामुळे रस्त्यावरील धोकादायक परिस्थिती वाढत चालली आहे. परिणामी, प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सतत अपघात होत असल्याने मुंबई-नाशिक महामार्ग आता 'मृत्यूचा सापळा' ठरत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यावर त्वरित उपाययोजना न झाल्यास भूमाता ब्रिगेडकडून आक्रमक आंदोलन छेडले जाईल, असा ठाम इशारा किरण मुसळे यांनी दिला.रस्ते प्राधिकरण विभागाने वेळीच लक्ष देऊन रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करावे, अन्यथा भूमाता ब्रिगेडच्या वतीने तृप्ती देसाई यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे मुसळे यांनी स्पष्ट केले. महामार्गावरील रखडलेल्या कामामुळे होणाऱ्या अपघातांना थांबवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अन्यथा भूमाता ब्रिगेड रस्त्यावर उतरणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# लिंग गुणोत्तर प्रमाण वाढीच्या दृष्टीने समिती गठीत करावी : जिल्हाधिकारी

## पीसीपीएनडीटी अंतर्गत जिल्हा दक्षता समितीची बैठक संपन्न



**नाशिक ।** गर्भधारणापुर्व व प्रसुती पुर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंधक) कायदा 1994 सुधारीत 2003 कायद्याचा प्रचार, प्रसिद्धी प्रभावीपणे करण्यासोबतच गेल्या तीन वर्षात ज्या तालुक्यात लिंग गुणोत्तर प्रमाण घटले आहे तेथे लिंग गुणोत्तर वाढीकरिता प्रभावी अंमलबजावणीसाठी समिती गठीत करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात पीसीपीएनडीटी अंतर्गत जिल्हा दक्षता समितीची आयोजित बैठकीत शर्मा बोलत होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारूदत्त शिंदे, नाशिक, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप सुर्यवंशी, महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ.विजय देवकर, मालेगाव महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री आहेर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, डॉ.हर्षल नेहते, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत देवरे, जिल्हा परिषदेचे कार्यक्रम अधिकारी प्रताप पाटील, पोलीस अधीक्षक एम. व्ही. चव्हाण जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. राहूल हडपे, अ‍ॅड सुवर्णा शेपाळ यांच्यासह सर्व वैद्यकीय अधीक्षक व अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी शर्मा म्हणाले की, काही तालुक्यात गत तीन वर्षांत लिंग गुणोत्तर कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, ही बाब चिंताजनक असून लिंग गुणोत्तर घटण्याची नेमकी कारणे शोधणे व त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी व जिल्हा महिला व बाल विकास विभाग यांच्यामार्फत समिती गठीत करण्यात येवून याबाबतचा अहवाल त्वरीत सादर करावा. गर्भधारणापुर्व व प्रसुती पुर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंधक) कायद्यानुसार जिल्ह्यातील अवैध सोनोग्राफी केंद्रांची काटकोर तपासणी केली जावी. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करावी. मातृवंदाना योजनेंतर्ग लाभार्थ्यांचे प्रलंबित असलेले लाभ त्वरीत प्रदान करण्यात यावे. यासोबतच प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व आभा कार्डसाठी प्रत्येक व्यक्तीची नोंदणी होणे अत्यावश्यक असून यातून जिल्ह्यातील एकही व्यक्ती सुटता कामा नये याबाबतचे सुत्रबद्ध नियोजन करावे. नोंदणीसाठी ग्रामीण भागासह शहरातही विशेष कॅम्प आयोजित करून नागरिकांची नोंदणी करण्यास गती द्यावी, अशा सूचनाही शर्मा यांनी दिल्या.

# शेतकरी दिनानिमित्त सिन्नर बाजार समितीत शेतकऱ्यांचा सन्मान

**सिन्नर ।** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात कृषी संस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणुन व कृषी दिनाचे औचित्य साधुन लायन्य क्लब ऑफ युनिटी व बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रातिनिधीक स्वरुपात शेतकऱ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला. हरीत क्रांतीचे जनक महानायक स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त शासन स्तरावर प्रत्येक वर्षी कृषिदिन साजरा केला जातो.

या प्रसंगी लायन्स क्लब तर्फे प्रगतीशिल शेतकऱ्यांना कृषि क्षेत्रातील योगदानासाठी झाडांचे रोपटे वाटप करण्यात आले व बाजार समिती तर्फे ग्रामिण विकासात हातभार लावणाऱ्या शेतकऱ्यांचा शाल व टोपी देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. प्रमुख सत्कारमुर्ती शेतकरी सर्वश्री राजेंद्र गोळेसर, किरण लोणारे, रतन लोंढे, संतोष



केदार, बाळासाहेब लोंढे, सचिन सानप, आप्पा माळी, गोरख शिरसाठ, नितीन पवार आदी शेतकरी कांदा शेतमाल विक्रीसाठी आवारात उपस्थित असल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. बाजार समितीचे कार्यालया समोर असलेल्या स्व.वसंतराव नाईक यांच्या अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी बाजार समितीचे सभापती गणेश घोलप, उपसभापती सिंधुताई कोकाटे, संचालक नवनाथ नेहे, लायन्स क्लब ऑफ युनिटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुनिल चकोर, सचिव विकास महाजन, खजिनदार वसंत पटेल, कांतीभाई पटेल, महेंद्र तारगे, किशोर लहामगे, डॉ.प्राणेश सानप, डॉ.महाविर खिवंसरा, संजय देशमुख, स्वप्निल धुत, नितीन पटेल, बाजार समितीचे व्यापारी बाळकृष्ण चकोर, दिलीप खिंवंसरा, बाबुशेठ लठ्ठा, अनिलशेठ कलंत्री, महेश पारख, सतिष चकोर, विजय तेलंग यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कांतीभाई पटेल यांनी केले. आभार सचिव विजय विखे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाजार समितीचे कर्मचारी व अधिकारी दिलीप राजेभोसले, सोमनाथ चव्हाणके, रंगनाथ डगळे, योगेश गोळेसर, संजय वाळूंज यांनी परिश्रम घेतले.

# मविप्र फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी परीक्षेत यश

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे मे २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षेच्या वार्षिक निकालात भरारी घेत औषधनिर्माण शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या मविप्र कॉलेज ऑफ फार्मसीच्या पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. यामधे प्रथम वर्षाचा ८९.०९ टक्के आणि द्वितीय वर्षाचा ९०.६९ टक्के निकाल लागला आहे. डी. फार्मसी प्रथम वर्षातील अंशु यादव (82.40 %) प्रथम क्रमांक, ओमकार भागवत (80.60%) द्वितीय क्रमांक, तर स्नेहल जाधव हिने (80.50%) तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच डी.फार्मसी द्वितीय वर्षातील यशश्री उबाळे (84.27%) प्रथम, नारायणी गायकवाड (83.91%) द्वितीय क्रमांक आणि प्रिया गांगुर्डे हिने (82.64%) तृतीय क्रमांक मिळविला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे व पदाधिकारी संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी डॉ. अजित मोरे, प्राचार्य डॉ. डी. व्ही. डेर्ले, उपप्राचार्य डॉ. मिलिंद वाघ, डॉ. जी. बी. जाधव, विभागप्रमुख डॉ. के. आर. नाठे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.



# खेड भैरव येथे सुधारित भात लागवड प्रशिक्षण

## बायफ व कृषी विभाग इगतपुरी यांच्या संयुक्त पुढाकाराने उपयुक्त मार्गदर्शन

**बेलगाव कुर्‍हे ।** खेड भैरव (ता. इगतपुरी) येथे बायफ लायलीहूड नाशिक व महाराष्ट्र शासन कृषी विभाग, तसेच नाबार्डच्या आर्थिक सहकार्याने व सह्याद्री पाणलोट क्षेत्र सामाजिक संस्था, खेड कानडवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने सुधारित भात लागवड प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. प्रशिक्षणाआधी शेतकऱ्यांना भात बियाणे व युरिया ब्रिकेटचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात हनुमान मंदिर परिसरात झाली. यानंतर उपस्थित शेतकऱ्यांना बायफचे प्रशिक्षक प्रशांत बोराडे यांनी भात लागवडीच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये रोपवाटिका, रोप व्यवस्थापन, चारसूत्री पद्धत, खत व पाणी व्यवस्थापन यांचा समावेश होता.

कार्यक्रमात इगतपुरी कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी भास्कर गीते यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प याविषयी माहिती दिली. तर उप कृषी अधिकारी किशोर भरते यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत – जसे की कृषी यांत्रिकीकरण योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, ॲग्री स्टॅक इत्यादी बाबत मार्गदर्शन केले. यानंतर शेतकरी शिवाजी वाजे यांच्या शेतावर प्रत्यक्ष चारसूत्री भात लागवडीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यामध्ये सहभागी शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी बायफचे वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक सुरेश सहाणे, प्रकल्प अधिकारी प्रशांत बोराडे, आकाश जाधव, बाबासाहेब गोरे, ग्रामविकास अधिकारी पुष्पा धिंदळे, संस्थेचे अध्यक्ष गोविंद धादवड यांनी विशेष मेहनत घेतली.

## ➤ महत्त्वाचे

# क्लासेस नियंत्रण कायद्यासंदर्भात संघटनेचे शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**नाशिक ।** विधानसभेच्या सध्याच्या अधिवेशनात, राज्यातील कोचिंग क्लासेस नियंत्रण व नियमन विधेयक, मांडण्यात येणार आहे. हे



विधेयक विधानसभेत मंजूर झाल्यास, त्याचे कायद्यात रूपांतर होईल व इतर राज्यांप्रमाणे, खासगी क्लासेस सुरू करायचे असल्यास किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कोचिंग सेंटर्सला, सरकारची रितसर परवानगी घ्यावी लागेल व विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या सुविधा पुरवाव्या लागतील. या अशा अनेक अटींनीयुक्त हे विधेयक मांडण्यात येणार आहे; परंतु या नवीन कायद्याच्या अंमलबजावणीनंतर, सर्वसामान्य क्लासेस संचालकांला क्लासेस घेण्यास अडथळा निर्माण होऊ नये व साधी सोपी नोंदणी करुन, नियम तयार करावेत, अशी मागणी संघटनेने काल शिक्षणमंत्री दादा भुसे यांना भेटून त्यांच्याकडे केली. यासंदर्भात एक निवेदनही देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष जयंत मुळे, उपाध्यक्षा विद्या राकडे, प्रतिभा देवरे , रोहिणी भामरे, कांता घाडगे, मेघा हिरवे, सोनाली आहेर, माजी राज्याध्यक्ष शिवाजीराव कांडेकर, अण्णासाहेब नरुटे, मुकुंद रनाळकर, वाल्मिक सानप आदी पदाधिकारी उपस्थित होते. मंत्र्यांनी आश्वासन दिले की, विधेयक मांडण्यात येईल पण जास्तीत जास्त प्रयत्न करेल की, व्यवसायाला बाधा येणार नाही.

# पुणे विद्यार्थी गृह संचलित कुलगुरू केतकर इंग्लिश स्कूल प्री-प्रायमरी वर्गाचा प्रारंभ




**नाशिक ।** पुणे विद्यार्थी गृह संचलित कुलगुरू दादासाहेब केतकर इंग्लिश स्कूल प्री-प्रायमरी विभागाचा शुभारंभ आनंदायी आणि उत्साही वातावरणात पार पडला. शाळेच्या पहिल्या दिवशी नव्याने प्रवेश घेतलेले चिमुकले, बालगोपाळ आणि त्यांचे पालक यांची उस्फुर्त अशी उपस्थिती होती.

शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांचे मनोबल वाढविण्यासाठी शाळेच्या प्रवेशद्वारी सजवलेले उंट, घोडे, आणि कार्टून पात्रांचे मिकी माउस, छोटा भीम, भव्य देखावे उभारण्यात आले होते. फुग्यांची सजावट, रंगीत आकर्षक रांगोळ्या आणि गोड स्वागत गीतांनी सर्वांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांसाठी सर्व वर्गात आकर्षक खेळणी,आनंददायी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले होते. नाशिक शाखेचे संचालक तथा संस्थेचे उपकार्याध्यक्ष अमोल जोशी यांनी संस्थेच्या, शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत कार्यपद्धतीची माहिती दिली आणि बालगोपालांच्या शैक्षणिक प्रवासाच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या. आपली शाळा म्हणजे गुणवत्तापूर्वक इंग्रजी शिक्षण, मूल्यसंस्कार, बालमित्र वातावरण यांचा संगम असल्याचे सांगितले. संस्थेच्या शताब्दी महोत्सवात प्री-प्रायमरीच्या रूपाने नव्या अध्यायाची सुरुवात होत असल्याने आजचा दिवस महत्वाचा आहे असेही जोशी यांनी सांगितले. प्रारंभी सर्व नवागतांचे औक्षण करीत ढोल ताश्यांच्या गजरात सागत करण्यात आले. त्यानंतर संस्थापक कुलगुरू दादासाहेब केतकर यांच्या आणि देवी सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षिका दीपा अडोळे यांनी सूत्रसंचालन केले. सोनल जोशी यांनी अभ्यासक्रम आणि विविध कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. प्रा.दिलीप अहिरे यांनी आभार मानले. यावेळी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर निंबेकर, सुदाम सूर्यवंशी, सुनिल पावसे, मकरंद मुळे, विशाल गोवर्धने सर्व विद्यार्थी, पालक, हितचिंतक उपस्थित होते.

# मुक्त विद्यापीठाचा वर्धापन दिनानिमित्त प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा पारितोषिकाने सन्मान

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ३६ व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या हस्ते प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण समारंभ विद्यापीठ सभागृहात संपन्न झाला.



विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या माहे मार्च व मे २०२४ मध्ये झालेल्या अंतिम परीक्षेमधील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे ३६ पारितोषिके तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा यातील सहा गुणवंत वाचक विद्यार्थ्यांना ही पारितोषिके देण्यात आली. व्यासपीठावर विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव दिलीप भरड, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले, की सन २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्यासाठी प्रत्येक भारतवासीयाने झटून काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येकामधील क्षमता विकसित होणे आवश्यक आहे आणि या क्षमता विकसित करण्याचे कार्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ करत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार विद्यार्थी आता या मुक्त विद्यापीठातून एकाचवेळी दोन पदव्या प्राप्त करू शकतो. त्यामुळे रोजगार नोकरीच्या अधिक संधी प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

विद्यापीठाचा वर्धापन दिन हा नवीन संकल्पनांचा व नव्या संकल्पांचा असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी आपल्या भाषणात सांगितले. विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड यांनी प्राविण्यप्राप्त विद्याथी हे विद्यापीठाचे शिक्षण दूत असल्याचे सांगितले. यानिमित्ताने विद्यापीठातर्फे दरवर्षीप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, क्रांरोजगार नोकरीच्या तीज्योती सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, कै. भाऊसाहेब हिरे, डॉ. चिंतामणराव देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख, भीमाबाई आंबेडकर, वेणूताई चव्हाण, लक्ष्मीबाई पाटील, डॉ. बापुजी साळुंखे, श्रीमती शारदाबाई पवार, हेमलता फडके व डॉ. भालचंद्र फडके, मोहनलालजी डागा, डॉ. एस. जी. महाजन, कै. शिवाजीराव सोनार, पद्मसुला, प्रा. के. वाय. सोनावणे, दादासाहेब पोतनीस, गोपाळराव पंडित, कविता मेहेंदळे, मुरलीधर वडनेरे, दादासाहेब रेगे या ज्येष्ठ – श्रेष्ठ व्यक्तींच्या नावाने गुणवंत विद्यार्थ्यांना ही पारितोषिके देण्यात आली. विविध शिक्षणक्रमांमधील एकूण ३६ पारितोषिके प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना दिली गेली. त्यात मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील २१, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील ७, कृषी विज्ञान विद्याशाखेतील ५ व शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील ३ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, ज्ञान स्त्रोत केंद्र प्रमुख डॉ. प्रकाश बर्वे, डॉ. सुभाष सोनुने, डॉ. पूनम वाघ यांनी या पुस्तक परीक्षण स्पर्धेचे परीक्षण केले. भटूप्रसाद पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन नाट्यशास्त्र विभागाचे संचालक श्री. सचिन शिंदे यांनी केले तर विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड यांनी आभारप्रदर्शन केले.

